विठ्ठलनामाच्या गजरात आमदार लांडगे तल्लीन

श्री विठ्ठल-रुक्मिणीचे घेतले मनोभावे दर्शन; भोसरीतील काकड आरतीला सपत्नीक उपस्थिती

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

'उठा उठा पांडुरंगा, प्रभात समयो पातला...' या भक्तिमय स्वरांनी दुमदुमलेल्या भोसरी गावठाणातील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आमदार महेश लांडगे यांनी सपत्नीक उपस्थित राहून पारंपरिक काकड आरतीचा भक्तिभावाने आनंद घेतला. विठ्ठलनामाचा अखंड गजर, टाळ-मृदंगाचा निनाद आणि वारकरी परंपरेच्या मंगलमय वातावरणात आमदार लांडगे यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणीचे मनोभावे दर्शन घेतले.



महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा भोसरी गावठाणात आजही मोठ्या श्रद्धेने जपली जात आहे. याच परंपरेचा भाग असलेल्या पहाटेच्या काकड आरतीमध्ये सहभागी होत आमदार महेश लांडगे यांनी विठ्ठलभक्तीचा अनोखा अनुभव घेतला.

यावेळी भोसरी गावातील ज्येष्ठ मान्यवर, ग्रामस्थ आणि विठ्ठलभक्त मोठ्या श्रद्धेने उपस्थित होते. आरतीनंतर आमदार लांडगे यांनी गावातील ज्येष्ठ आणि जाणत्या ग्रामस्थांशी स्नेहपूर्ण संवाद साधला. त्यांच्या आशीर्वादासह गावाच्या सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेबद्दल आत्मीयता व्यक्त केली.

भोसरीच्या मातीशी असलेली नाळ आणि वारकरी संस्कृतीविषयीची श्रद्धा यांचे दर्शन या निमित्ताने घडले. लोकप्रतिनिधी म्हणून सार्वजनिक जीवनात कार्यरत असतानाही गावातील धार्मिक परंपरा, ज्येष्ठांचा सन्मान आणि सांस्कृतिक वारसा यांच्याशी असलेले नाते आमदार लांडगे यांनी या उपस्थितीतून अधोरेखित केले.

काकड आरती ही केवळ धार्मिक उपासना नसून भक्ती, समता, एकात्मता आणि सामाजिक सलोख्याचा संदेश देणारी महाराष्ट्राची महान सांस्कृतिक परंपरा आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि समस्त वारकरी संतांनी दिलेल्या विचारांचा वारसा अशा धार्मिक उपक्रमांतून आजही जिवंत असल्याची भावना या निमित्ताने व्यक्त झाली.

वारकरी संस्कृतीचा वारसा जपण्याचा संदेश

महाराष्ट्राच्या संतपरंपरेने समाजाला भक्तीबरोबरच माणुसकी, समरसता आणि परस्पर सन्मानाची शिकवण दिली आहे. भोसरीतील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील काकड आरतीच्या निमित्ताने या विचारांचा पुन्हा एकदा जागर झाला. विठ्ठलनामाचा गजर अखंड सुरू राहावा आणि भक्ती-संस्कृतीचा हा अनमोल वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावा, अशी प्रार्थना आमदार लांडगे यांनी पांडुरंग चरणी केली.

> "श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी नतमस्तक होताना मनाला विलक्षण समाधान आणि सकारात्मक ऊर्जा मिळते. भोसरी गावठाणातील काकड आरतीची परंपरा ही आपल्या गावाच्या श्रद्धेची आणि सांस्कृतिक समृद्धीची ओळख आहे. संतांनी दिलेली भक्ती, समता, माणुसकी आणि एकात्मतेची शिकवण हीच आपल्या समाजाची खरी ताकद आहे. ज्येष्ठ ग्रामस्थांचे आशीर्वाद आणि विठ्ठलभक्तांचा स्नेह ही माझ्यासाठी मोठी शिदोरी आहे. पांडुरंगाच्या कृपेने सर्वांच्या जीवनात सुख, समाधान आणि समृद्धी नांदो, हीच प्रार्थना!"
>
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी- चिंचवड, पुणे.

टायटॅनिकच्या अद्भुत विश्वाची पिंपरी-चिंचवडकरांना भुरळ; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

जगभरातील नागरिकांच्या मनात आजही प्रचंड कुतूहल निर्माण करणाऱ्या ऐतिहासिक टायटॅनिक जहाजाचे अद्भुत विश्व सध्या पिंपरी-चिंचवडकरांच्या आकर्षणाचे केंद्र ठरले आहे. रावेत येथील मुकाई चौकात डी जे एम्युजमेंट कंपनीच्या वतीने उभारण्यात आलेल्या भव्य टायटॅनिक प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. इतिहासाची रंजक सफर, जहाजाच्या भव्यतेचा अनुभव, आकर्षक देखावे आणि मनोरंजनाच्या विविध साधनांमुळे हे प्रदर्शन लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांच्याच पसंतीस उतरले आहे.



गेल्या सुमारे महिनाभरापासून सुरू असलेल्या या प्रदर्शनाने पिंपरी-चिंचवड शहराच्या सांस्कृतिक आणि मनोरंजन विश्वात वेगळीच उत्सुकता निर्माण केली आहे. टायटॅनिक जहाजाचा इतिहास केवळ पुस्तकांतून किंवा चित्रपटातून जाणून घेण्याऐवजी त्याच्या भव्य प्रतिकृतीतून अनुभवण्याची संधी मिळत असल्याने नागरिक मोठ्या संख्येने प्रदर्शनाला भेट देत आहेत. विशेषतः जहाजाच्या आकर्षक देखाव्यासमोर आणि ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांच्या प्रतिकृतींसोबत छायाचित्रे काढण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे.

टायटॅनिक म्हटले की डोळ्यांसमोर उभे राहते ते जगातील सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या आलिशान जहाजाचे चित्र आणि त्याच्या पहिल्याच प्रवासात घडलेली भीषण दुर्घटना! टायटॅनिकच्या दुर्घटनेवर आधारित चित्रपटाने जगभरातील प्रेक्षकांना भावनिक केले. मात्र, या जहाजाच्या निर्मितीमागील इतिहास, त्याची भव्यता, तत्कालीन तंत्रज्ञान आणि त्याच्याशी संबंधित अनेक ऐतिहासिक बाबी आजही सर्वसामान्य नागरिकांसाठी कुतूहलाचा विषय आहेत.

नेमके हेच कुतूहल लक्षात घेऊन डी जे एम्युजमेंट कंपनीने रावेत येथे टायटॅनिक जहाजाचा भव्य देखावा साकारला आहे. या प्रदर्शनात प्रवेश केल्यानंतर आपण एखाद्या ऐतिहासिक जहाजाच्या विश्वात प्रवेश केल्याचा अनुभव मिळतो. आकर्षक सजावट, जहाजाशी संबंधित देखावे आणि माहितीपूर्ण मांडणीमुळे इतिहास जणू डोळ्यांसमोर जिवंत झाल्याची अनुभूती नागरिकांना मिळत आहे. केवळ ऐतिहासिक माहितीपुरते मर्यादित न राहता या प्रदर्शनात संपूर्ण कुटुंबासाठी मनोरंजनाच्या विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. प्रदर्शन परिसरात हॅण्डलूम, हँडीक्राफ्ट, आकर्षक खेळणी, पुस्तके, विविध खाद्यपदार्थ यांसह तब्बल ३५ स्टॉल्स उभारण्यात आले आहेत.

याशिवाय लहान मुलांसाठी तसेच मोठ्यांसाठी विविध प्रकारच्या मनोरंजक राइड्सची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे टायटॅनिकचा इतिहास जाणून घेण्याबरोबरच खरेदी, खाद्यसंस्कृती आणि मनोरंजनाचा आनंद एकाच ठिकाणी घेता येत आहे.

टायटॅनिकच्या निर्मितीपासून दुर्घटनेपर्यंतचा इतिहास

टायटॅनिक जहाजाची निर्मिती कोणत्या कंपनीने केली? जहाजाच्या बांधकामाला कधी सुरुवात झाली? ते कधी पूर्ण झाले? पहिल्या प्रवासाला कधी निघाले? जहाजाचे वैशिष्ट्य काय होते? त्याचे कॅप्टन कोण होते? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे या प्रदर्शनाच्या माध्यमातून नागरिकांना मिळत आहेत. इतिहासातील एका महत्त्वपूर्ण घटनेची माहिती मनोरंजक आणि दृकश्राव्य स्वरूपात सादर करण्याचा प्रयत्न या प्रदर्शनातून करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी हे प्रदर्शन माहितीपूर्ण ठरत आहे.